# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई
# प्रेसनोट

**२०२२**

गुन्हे शाखा, नवीमुंबई

दिनांक १४.०१.२०२२

## अवैधरित्या समुद्रातील मोठया जहाजांमधुन डिझेल विकत घेवून बेकायदेशीरपणे विक्री करणारी टोळी गजाआड.

एकुण २१,४७० लिटर (२१.४ टन) डिझेल किमंत १६,१०,२५०/- रू. ९३०० लिटर्स डिझेल विक्री करून मिळालेली ६,८७,५००/-रू रोख रक्कम व डिझेल विक्री करण्यासाठी वापर केलेल्या दोन बोटी अंदाजे किमंत १२,००,०००/-रू असा **एकुण ३५,०२,७५०/-रू किमंतीचा मुददेमाल जप्त.**

---

दिनांक १२/०१/२०२२ रोजी श्री. सुरेश मेंगडे, पोलीस उप आयुक्त,(गुन्हे) नवी मुंबई व श्री. कान्हुराज बगाटे, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई तथा राज्यस्तरीय दक्षता प्रमुख यांना मुंबई, नवी मुंबई व रायगडच्या सागरी हद्दीत अवैधरित्या समुद्रातील मोठया जहाजांमधून डिझेल विकत घेवुन बेकायदेशीरपणे बोटीतून विक्री करणा-या टोळीबाबत माहिती मिळाल्याने नवी मुंबई गुन्हे शाखा व शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचेकडील संयुक्त पथक तयार करून नवी मुंबई समुद्र हददीत खाजगी बोटीने टेहळणी करत असताना उलवे जेटटीच्या पुढे काही अंतरावर एक सशंयास्पद बोट पुढे जात असल्याचे दिसून आले. सदर बोटीचा पाठलाग करत कारंजा जेटटी, उरणच्या पुढे रायगडच्या दिशेने जात असताना काही अंतरावर सदरची बोट ही दुस-या एका बोटीच्या जवळ थांबलेली दिसली. नमूद संशयास्पद बोटींची वरील पथकाने पंचासमक्ष पाहणी केली असता एकवीरा साई सागर बोटीमध्ये एकुण ०५ इसम मिळून आले. नमूद इसमांना ताब्यात घेवून दोन्ही बोटींची पाहणी केली असता नमूद दोन्ही बोटींच्या वेगवेगळया कप्प्यामध्ये **एकुण २१,४७० लिटर्स डिझेल किमंत रूपये १६,१०,२५०/-रू, तसेच नमूद आरोपींनी इतर मच्छीमार करणा-या बोटींना** बेकायदेशीरपणे ९३०० लिटर्स डिझेल विक्री करून मिळवलेली ६,८७,५००/-रू रोख रक्कम, व डिझेल साठवणूक करून विक्री करण्यासाठी वापरलेल्या दोन बोटी अंदाजे किमंती १२,००,०००/-रू असा **एकुण ३५,०२,७५०/-रू किमंतीचा मुददेमाल जप्त** केला आहे.

नमूद आरोपी हे पेट्रोलियम द्रव पदार्थ खरेदी, साठवणूक व विक्री करण्यासाठी आवश्यक असलेला विस्फोटक परवाना व इतर कोणतेही आवश्यक वैधानिक परवाने न बाळगता, अतिज्वलनशिल पदार्थाची अनधिकृतपणे संपादन व विक्री करून शासनाचा महसूल बुडविला. त्यामुळे नमूद आरोपींविरूध्द एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. १७/२०२२ भादवि कलम २८५ सह १) जिवनावश्यक (अत्यावश्यक) वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३,७,८ २) मोटार स्पीरीट ॲन्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रीब्युशन ॲन्ड प्रिव्हेंशन ऑफ माल प्रॅक्टीसेस) ऑर्डर,२००५ चे कलम २(ए), (पी),(क्यू), (आर),(एस), (टी),३ (४),३(५), ३) दि पेट्रोलियम प्रॉडक्टस् (मॅटेनन्स ऑफ प्रॉडक्शन,

स्टोरेज ॲन्ड सप्लाय) ऑर्डर, १९९९ मधील लागू असलेली कलमे ४) पेट्रोलियम ॲक्ट, १९३४ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील

**अटक आरोपीतांची माहिती**

१) सलीम अब्दुल हमीद शेख वय ५० वर्षे रा. चिरागनगर, घाटकोपर मुंबई
२) आसिफ नैमुददीन वलियानी वय ४६ वर्षे रा. माझंगाव मुंबई
३) प्रविण पंढरीनाथ नाईक वय ३४ वर्षे रा. दादर बेडी ता. पेण जि. रायगड
४) विठठल धोंडीबा देवकाते वय १९ वर्षे रा. दादर उरनोली परमानंद वाडी, ता. पेण रायगड
५) दत्ता धोंडीबा देवकाते वय २४ वर्षे रा. दादर उरनोली परमानंद वाडी, ता. पेण रायगड

**हस्तगत मालमत्ता :-**

१) **एकुण २१,४७० लिटर (२१.४ टन) डिझेल किमंत रू १६,१०,२५०/-**
२) ९३०० लिटर्स डिझेल विक्री करून मिळालेली **६,८७,५००/-रू रोख रक्कम**
३) डिझेल विक्री करण्यासाठी वापर केलेल्या **दोन बोटी अंदाजे किमंत १२,००,०००/-रू** असा **एकुण ३५,०२,७५०/-रू किमंतीचा मुददेमाल**

**आरोपीतांची गुन्हा करण्याची पध्दत:-**

नमूद गुन्हयातील आरोपी हे सदरचा साठा हा अनधिकृतरित्या इतर मोठया जहाजावरून ६०/-रू प्रतिलिटर या दराने प्राप्त करून तो खरेदी करण्यासाठी येत असलेल्या बोटीधारक व्यक्तींना डिझेलच्या बाजारभावापेक्षा कमी किमतींत अंदाजे ७३/- ते ७५/-रू प्रति लिटर या दराने विक्री करतात.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री.बिपीनकुमार सिंह सो, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. श्री जय जाधव सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. महेश घुर्ये सो यांचे मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष कारवाईमध्ये सहभागी झालेले अधिकारी व अमंलदार १) मा.श्री सुरेश मेंगडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), नवी मुंबई २) श्री. विनायक वस्त, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), नवी मुंबई ३) श्री. विजयसिंह भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा ४) श्री. सुनिल शिंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कक्ष-१, गुन्हे शाखा ५) श्री. सुनिल पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरण पोलीस ठाणे ६) राजेश गज्जल सहा. पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा ७) हर्षल कदम, सहा. पोलीस निरीक्षक, कक्ष-१ गुन्हे शाखा ८) पोना/ विष्णु पवार ९) पोना/ मेघनाथ पाटील १०) पोना/ लक्ष्मण कोपरकर ११) पोना/चालक सतीश चव्हाण १२) पोना/ चालक देवकुळे १३) पोशि/ खांडेकर सर्व नेमणूक गुन्हे शाखा

तसेच १) श्री. कान्हूराज बगाटे, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई २) ज्ञानेश्वर जवंजाळ, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे, ३) सुभाष डुंबरे, सहायक शिधावाटप अधिकारी ४) रणजीत नलावडे, शिधावाटप निरीक्षक यांच्या सयुंक्त पथकाने केली आहे.

------------